# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/०६/२०२५ (मंगळवार)

## पोलीस स्टेशन खापा अंतर्गत द्वारका वॉटर पार्क येथील घटनेबाबत अधिक माहीती.

पोलीस स्टेशन खापा अंतर्गत दिनांक १५/०६/२०२५ रोजी वॉटर पार्क, वाकी ता.सावनेर जि.नागपुर येथे पर्यटकांना मारहाणी संदर्भात पोलीस स्टेशन खापा येथे **कलम ११८(१),३५१ ,३५२ भान्यासं अन्वये** दाखल गुन्हयात पोलसांनी सखोल तपास करीत सदर गुन्हयात **दिनांक १७/०६/२०२५ रोजी कलम ७४, १८९(२), १९१(२), १९० भा.न्या.सं अन्वये विनयभंग आणि दंगलीबाबत कलम वाढ करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्हातील आरोपी १).प्रविण मोरेश्वर बागडे, वय २६ वर्षे,रा.वस्ती खापा,ता.सावनेर जि. नागपुर, २).कोमल मनोहरजी गायकवाड,वय ३१वर्षे,रा वाघोली ता.सावनेर जि. नागपुर, ३).प्रमोद भावरावजी चिखले, वय ४२ वर्षे,रा. वाकी. ता.सावनेर जि. नागपुर, ४).ईशांत रमेश सुर्यवंशी, वय ३६ वर्षे,रा वाकी ता.सावनेर जि. नागपुर, ५) मुकेश अशोक निपाणे, वय ३४ वर्षे, रा लालगंज,खैरीपुरा, नागपुर आणि ६) जिशान पैइमउद्दीन सलमानी, वय २४ वर्षे, रा. वलणी कॉलनी ,युको बॅकजवळ, ता.सावनेर जि. नागपुर यांना दिनांक १७/६/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच पाहीजे आरोपी नामे सुभाष दुर्योधन कुमरे, रा कळमना, जि नागपुर आणि अजित अरूण पाटील, रा. रमानगर, कामठी, जि. नागपुर यांचा पोलीस शोध घेत आहेत.**

## खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत खुन करणाऱ्या २ आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— फिर्यादी नामे श्री. सुमीत तुळशीराम पाटील, वय ३० वर्षे, रा. वार्ड कं १, पिपळा डाग बंगला, ता. सावनेर यांनी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे रिपोर्ट दिली की, **फिर्यादीचा भाऊ मृतक नामे अतुल तुळशीराम पाटील, वय ३२ वर्षे, रा. वार्ड कं १ पिपळा**

**डाग बंगला, ता. सावनेर** याला दिनांक १७/०६/२०२५ रोजी रात्री ०२:०० वाजेच्या सुमारास मृतकाच्या मालकीचे पाणी फिल्टर चे दुकानाजवळ वलनी मोड, पिपळा, डाग बंगला येथे आरोपी नामे हिमांशु दिलीप कुभंलकर, रा. पिपळा डाग बंगला, ता. सावनेर याने जुन्या पैशांच्या वादातुन चाकुने मृतकाला गंभीर जखमी करून त्याचा खुन केला आहे. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून कलम १०३(१) भारतीय न्याय संहीता अधिनियम अन्वये गुन्हा नोंद आहे. खापरखेडा पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयांचा तपास सुरू करून आरोपी क्रं २ नामे **विष्णु मुकुंदाराव कोकड्डे,** वय. ३८ वर्षे, रा. **वार्ड क्रं २ पिपळा,डाग बंगला, ता. सावनेर** याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान कलम ४९ भारतीय न्याय संहीता अधिनियम आणि कलम ४,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अशी कलम वाढ करण्यात आली आहे.

**खापरखेडा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांनी संयुक्तपणे आरोपी क्रं १. हिमांशु दिलीप कुभंलकर, वय १९ वर्षे, रा. पिपळा डाग बंगला, ता. सावनेर आणि आरोपी क्रं २ विष्णु मुकुंदाराव कोकड्डे, वय ३८ वर्षे, रा. वार्ड क्रं २ पिपळा डाग बंगला, ता. सावनेर यांचा तात्काळ शोध घेतला. आरोपी क्रं १ याला सावनेर येथुन आणि आरोपी क्रं २ याला वार्ड क्रं २ पिपळा डाग बंगला येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांना खापरखेडा पोलीसांनी तात्काळ अटक केली असुन आरोपी क्रं चा दिनांक २१/०६/२०२५ रोजी पर्यंत आणि आरोपी क्रं २ चा दिनांक १९/०६/२०२५ रोजी पर्यंत पोलस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## १४ गोवंश जनावरांची सुटका,बोरी पोलसांची कामगिरी
## १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक १७/०६/२०२५ रोजी बोरी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, आयशर ट्रक मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी एन. एच. ४४ नागपूर ते बोरी रोड मौजा मोहगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ४० सी.टी. २८०६** मिळुन आला. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकाने नाव पत्ता विचारले

असता चालक आरोपी नामे **अनिल रामदास पातोंड, वय ३९ वर्षे, रा. महीन्द्रा नगर. शितला माता मंदीर, बाबासाहेब आंबेडकर वार्ड, प्लॉट नं ३ ब, नागपुर ,अशी माहीती समजली**. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **१४ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावरे खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ४० सी.टी. २८०६ किंमती १५,००,०००/— रूपये. व १४ गोवंश जनावरे किंमती १,४०,००० /— रूपये असा एकुण किंमती १६,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या १४ गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन श्रीकृष्ण गौशाळा, तुरकमारी ,बुटीबोरी येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद प्रकरणी चालक आरोपी नामे अनिल रामदास पातोंड, वय ३९ वर्षे, रा. महीन्द्रा नगर, शितला माता मंदीर, बाबासाहेब आंबेडकर वार्ड, प्लॉट नं ३ ब, नागपुर याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम सहकल ४९ भा. न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला आहे. वाहन चालक आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरी करून साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक १६/०६/२०२५ पारशिवणी पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बाबुळवाळा शिवारातील चित्रछाया मंदीराचे कंपाऊंड चे बाजुला असलेल्या पडीक जागेत झाडाझुडपामध्ये आरोपी नामे संदीप यशवंत भागडकर रा. बाबूळवाळा ता. पारशिवनी याने त्याचे ट्रॅक्टर ट्रॉली ने पेंच नदीच्या पात्रातुन अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून नमुद ठिकाणी साठा करून ठेवली आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलीसांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली असता तेथे १८ ब्रास रेती आढळुन आली.

पोलीसांनी पंचासमक्ष १८ ब्रास रेती किंमती ३६,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी नामे संदीप यशवंत भागडकर रा. बाबूळवाळा ता. पारशिवनी जि नागपुर याने

स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून चोरी केली आणि चोरी केलेली रेती साठवुन ठेवल्याने नमुद आरोपीविरूध्द **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ५ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन देवलापार**:— नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत देवलापार पोलीसांनी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द कारवाई करून ५ गुन्हें नोंद केले आहे. दिनांक १६/०६/२०२५ रोजी देवलापार पोलीस मोरफाटा दर्गा परीसरात पेट्रोलींग करीत असतांना मौजा मोरफाटा दर्गाचे मागे पाहणी केली असता **आरोपी क्रं १) राज विनोद रजक, वय १८ वर्ष, रा. वानाडोंगरी, ता. हिंगणा, टोल नाक्याजवळ, एमआयडीसी, नागपूर, आरोपी क्र.२) नामे आदीत्य मुकेश गजभिय, वय २२ वर्षे, रा. हिंगणा पोलीस स्टेशन चे मागे, नागपूर, आरोपी क्रं ३) नामे मोसीन खान नसिर खान, वय ३६ वर्ष, रा. यशोधरा नगर, शिवनगर, उप्पलवाडी नागपूर , आरोपी क्रं ४) नामे राजकुमार सुरेश क्षीरसागर, वय ३५ वर्ष, रा. संगम सावंगा. ता. सौंसर, पोस्टे लोधीखेडा, जिल्हा पांढूर्णा, राज्य मध्यप्रदेश, आरोपी क्रं ५) नामे मोहम्मद नौशाद मोहम्मद कबीर शेख, वय ३९ वर्ष, रा. अरविंद नगर, नागपूर** हे आरोपी मौजा मोरफाटा दर्गा चे मागे चिल्लम मध्ये गांजा पितांना मिळुन आले.

नमुद ५ आरोपतांवर पोलीस स्टेशन देवलापार येथेकलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ५ गुन्हें नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**